# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २३४- २३ दिनांक : - २७/०७/२०२३

## सायकल चोरी करणाऱ्या आरोपीतास अटक करुन ०५ गुन्हयांची उकल- नवघर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

फिर्यादी नामे श्रीमती पल्लवी प्रशांत क्षीरसागर, रा. सलासा रोड, कनकिया रोड, रामदेव पार्क, रोनह हॉटेल जवळ, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे यांची मुलगी नामे कनिष्का प्रशांत क्षीरसागर हि क्लासेस करीता तिची फोक्सटर कंपनीची काळ्या व पिवळ्या रंगाची सायकल मॉडेल ट्रीयंप अशी सायकल घेवुन ब्रेन टॉनिक क्लासेस, शिवप्रसाद बिल्डींग, बाळा साहेब ठाकरे गार्डनच्या समोर, भाईंदर पुर्व येथे गेल्या त्यांनी क्लासचे बाहेरील रोडवर सायकल पार्क करुन त्या क्लासमध्ये गेल्या व क्लास आटोपुन परत आल्या असता त्यांनी पार्क करुन ठेवलेल्या ठिकाणी त्यांना त्यांची पार्क करुन ठेवलेली सायकल मिळुन आली नाही. तेव्हा त्यांनी सायकलचा आजुबाजुच परिसरातध्ये शोध घेतला असता त्यांची खात्री झाली की, कोणीतरी अज्ञात चोरट्याने सदरची सायकल चोरी करुन घेवुन गेले आहे. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. I ४६८/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये दिनांक २३/०७/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

मागील सहा महिन्यापासुन नवघर पोलिस स्टेशनच्या हद्दीत सायकल चोरीचे गुन्हे वारंवार घडत असल्याने सदर बाबत वरिष्ठांनी सूचना व मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी ाव अंमलदार यांनी घटनास्थळ व घटनास्थळाच्या आजुबाजुचे तांत्रिक विश्लेषण करुन प्राप्त माहितीचे आधारे आरोपी नामे कलीम करिम शेख, रा. चंद्रेश निकेतन सोसायटी, लोधा रोड, नयानगर, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक २४/०७/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. अटक आरोपी याचाकडे अधिक तपास करुन त्याने चोरी केलेल्या एकुण ७२,०००/- रुपये किंमतीच्या एकुण ०९ सायकल हस्तगत करण्यात आल्या असुन एकुण ०५ गुन्हे उघडकीस आलेले आहेत

-:उघडकीस आलेले गुन्हे :-

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र व कलम |
|---|---|---|
| १. | नवघर पोलीस ठाणे | गु.रजि. क्र ४६८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ (मुळ गुन्हा) |
| २ | नवघर पोलीस ठाणे | गु.रजि. क्र -१३३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम-३७९ |

| | | |
|---|---|---|
| ३ | नवघर पोलीस ठाणे | गु.रजि. क्र १६२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम-३७९ |
| ४ | नवघर पोलीस ठाणे | गु.रजि. क्र २२५/२०२३ भा.दं.वि.सं. कलम-३७९ भादवि. |
| ५ | नवघर पोलीस ठाणे | गु.रजि. क्र २४८/२०२२ भा.दं.वि.सं. कलम-३७९ भादवि. |

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०१,मिरारोड, श्री. उमेश माने-पाटील, सहायक पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखील नवघर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय पवार, पो.नि. श्री. सुशिलकुमार शिंदे ( गुन्हे), सपोनि योगेश काळे, पोउनि. अभिजित लांडे, पोहवा. भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, जयप्रकाश जाधव, पो.अंम. ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत, विनोद जाधव यांनी केलेली आहे.




**-----000-----**